Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal


ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 6 | Issue - 1 | Feb - 2016

# जग बदलण्याची दृष्टी देणारा अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवनवाद

**राजकुमार मस्के**
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग , महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर.

***प्रस्तावना :—***
परिस्थिती व प्रतिभेच्या संगमातून निर्माण झालेले साहित्य वाचकाला जीवन जगण्याची सम्यक प्रेरणा देते. शोषणला नकार तर समतेचा पुरस्कार करते. अज्ञान, अंधश्रद्धा, बुझ्र्वा रुढी-परंपरा आणि कुरुपतेच्या तुरुंगाला सुरूंग लावते. कल्पनेच्या रम्य व अद्‌भूत जगात नेण्यापेक्षा, संवेदनशील माणसाची तहान व भूक हरवून टाकणाऱ्या दाहक वेदनांच्या प्रदेशांमध्ये घेवून जाते. भावना चाळविणारं, गुदगुल्या करून माणसातल्या वेदनेला क्षणभर विसरायला लावण्यापेक्षा अमानुषतेने माणसाला छळणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध शोषितांच्या मनात क्रांतीच्या मशाली पेटविते.

पारतंत्र्याचा पहाड पार करून स्वातंत्र्य, समता, शील आणि समर्पणाची सूचकतेने शिकवण देते. जीवनातल्या विसंगतीला आणि विकृतीला उद्‌ध्वस्त करणारा नायक-नायिका निर्माण करते. साहित्य सत्य, शिव आणि सुंदराला सरूप करते, देव दगडात नव्हे अनाथांना साथ देणाऱ्यांच्या हातात असतो, याची जाणीव करून देते. रंजन नव्हे, तर मनाला जडलेल्या रोगाला दुरूस्त करण्याचे काम साहित्य करते. अण्णा भाऊ साठे यांनी मानवाचे जगणे सुंदर करणारा जीवनवाद आपल्या साहित्यातून सूचकतेने सरूप केला. जग बदलण्याची दृष्टी देणारा हा जीवनवाद अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून कशाप्रकारे आविष्कृत केला आहे, याचा विनम्र शोध खालीलप्रमाणे घेतला आहे.



### अण्णा भाऊ यांचे चरित्र आणि छंद

वाटेगाव ता.वाळवा जि.सांगली येथील भाऊ व वालूबाई यांच्या पोटी जन्मलेल्या प्रतिभासंपन्न मुलाचे नाव तुकाराम. तुकाराम भाऊ साठे हेच विख्यात साहित्यिक म्हणून प्रसिद्ध झाले. ०१/०८/१९२० ह्या तारखेला जन्मलेल्या सुपुत्राने वाटेगावचे नाव संपूर्ण विश्वात केले. अस्पृश्यतेचे आणि आर्थिक दारिद्र्याचे चटके त्यांना लहानपणापासूनच बसले. अस्पृश्यता आणि दारिद्र्याने अण्णा भाऊ साठे यांच्यातील लेखकाला क्रांतिकारकत्वाची दीक्षा दिली व ह्यामुळेच त्यांनी जातदांडग्यांना व धनदांडग्यांना आपल्या नायक-नायिकेद्वारे कठोर शिक्षा केली.

वर्णव्यवस्थेने अण्णांचे शिक्षण संपविले. शिक्षणाची पाटी कोरीच ठेवली; पण दाहक जीवनातील वेदनांच्या विद्यापीठाच्या अनेक पदव्या भारतीय वर्णव्यवस्थेने त्यांना बहाल केल्या होत्या. त्या वेदनांच्या विद्यापीठांनी त्यांना शेकले व शिकविले. विविध छंदानीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला, "विशेष छंद म्हणजे कबुतर पाळणे, पोपट, साळुंखी, सुतारपक्षी अशी विविध पक्ष्यांची संगत करून त्यांच्या आवाजाची नक्कल करणे, त्यांचे निरीक्षण करणे, खेड्यातील जत्रा, कुस्त्या, तमाशा, डोंबाऱ्याचे खेळ, मिरवणूक, जलसे, संगीत, पोवाडे या सर्व गोष्टीत त्यांचे बारकाईने निरीक्षण असे... सर्वसाधारण १९३२ पर्यंतचा काळ दौडण्यातच गेला... ते लोकगीतं पाठ करायचे, ती चालीवर

गायचे, पोवाडे, लावण्या पाठ करायचे; म्हाताऱ्या माणसांकडून वेगवेगळ्या गोष्टी ऐकायचे. ऐकलेल्या कथा, पोवाडे इतरांना चवीनं सांगायचे... त्याच काळात क्रांतीसिंह नाना पाटील, आत्माराम पाटील, बेर्डे गुरुजी, पांडूमास्तर यांच्या नेतृत्वाने पेटलेले जी.डी. लाड, वसंतदादा पाटील, धोंडिराम माळी आदी असंख्य तरुण मुले राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या अग्निकुंडात बेधडकपणे उड्या घेत होती... या चळवळीची मुळे खेड्यापाड्यात खोलवररूजत होती. याच गोष्टीचे नकळत अण्णाभाऊंना वेड लागत होते. त्यामुळे अण्णाभाऊ घराबाहेर राहू लागला. पुढे पुढे तर बापू साठे या आपल्या चुलतभावाच्या तमाशाच्या फडाबरोबर यात्राही करू लागले. तेव्हा अण्णांचे हे प्रताप बघून वालूबाईंनी भाऊ साठे यांना पत्र लिहून 'काय बी करा पण आम्हाला मुंबईला घेऊन चला, नायतर तुक्या हातचा जाईचा' असे कळविल्याने भाऊ साठे यांनी विचार केला आणि सगळे घर मुंबईला हलविले."[१] पक्ष्यांविषयीची दयाबुद्धी, स्वतःतील कलागुणांना ओळखून त्या विषयीची तृप्ती करून घेणे, पारतंत्र्य, शोषणाबद्दलची चीड व सम्यक न्यायाची चाड आणि आपल्यातील हरहुन्नरी स्वभावाला पारखणारे छानदार छंद अण्णांना होते. आपल्या छंदांची छाटाछाट न करता छातीठोकपणे त्यांना जपणारा जीवनवाद त्यांच्या छंदातून सूचित होतो. भविष्यातील विश्वात्मक लेखकाची जाणीव करून देणारे, हे अनन्यसाधारण छंद आहेत.

### कलानिर्मितीच्या प्रेरणा :

कलावंताच्या संवेदनशील मनावर सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम होतो. वाचन, संस्कार व विशिष्ट विचारसरणीच्या परिणामाने तो अस्वस्थ होतो. कलावंतास आलेल्या भावानुभूतीचे संस्कारित रूप म्हणजे कलावंतांची कलाकृती होय. कलावंतांच्या मनातल्या उत्कट भावानुभूतीचे कलात्मक आविष्करण म्हणजे कला. जशी अनुभूती, तशी कलाकृती. कलावंताच्या कुवतीप्रमाणे कलाकृतीचे रूप-स्वरूप ठरते. अनुभूतीला औचित्यपूर्ण ठरेल; अशा प्रकारांतून वाङ्मयकृतीला तो समूर्त करतो. अण्णांच्या संदर्भात आपल्याला असे म्हणता येईल की, मार्क्स आणि आंबेडकरांची विचारधारा, ही त्यांच्या लेखनकृतींची प्रेरणा आहे. अण्णांनी माणसांवर जीवापाड प्रेम केले, हा माणूस त्यांच्या वाङ्मयकृतीची प्रेरणा आहे, "अवती-भवती माणसे, पाहिलेली, अनुभवलेली या सर्वांच्या जीवनाने अण्णाभाऊंच्या लेखनाला मोठेच खाद्य पुरवले. त्यांचे जीवन हीच एक त्यांच्या लेखनाची प्रेरणा बनून गेली. कारण हीच माणसे अण्णाभाऊंच्या मनाला एक वेगळी अशी उभारी देत होती. त्यामुळे त्यांच्या जीवनाचा आलेख चितारण्याचेच त्यांना वेड लागून गेले."[२] माणसाचे आर्थिक आणि सामाजिक शोषण अण्णांच्या कलानिर्मितीची एक प्रेरणा आहे. अनेकरंगी वेदनांच्या कळांनी ते अस्वस्थ झाले आणि याच कळांमधून त्यांनी आपल्या अक्षर कलाकृतींना जन्म दिला. कलाकृती केवळ प्रतिभेची नवनिर्मिती नसते, तर प्रतिभा, कल्पना, अनुभूती व सहानुभूतीतून कलाकृती सरूप होते, हे कलाकृतीच्या निर्मितीचे सूत्र अण्णांनी समग्र प्रतिभावंतांना दिले, "केवळ कल्पकतेचे कृत्रिम डोळे लावून, जीवनातील सत्य दिसत नसते. ते सत्य हृदयाने मिळवावे लागते. डोळ्यांनी सर्वच दिसते; परंतु ते सर्व साहित्यिकाला हात देत नाही. उलट दगा मात्र देतं."[३] जीवनातील काव्य, करूपता, कारुण्य आणि क्रांती आपल्या साहित्यातून त्यांनी दृग्गोचर केली. साहित्यातून जीवनातील सत्याचा सूचकतेने वेध घ्यावयास हवा. साहित्यिकांनी कल्पनेच्या कारंज्यात रमण्याऐवजी माणसांच्या आयुष्यातील कारूण्याचा वेध घेण्यातच रमण्याचा अस्सल जीवनवाद त्यांनी मांडला. कलावंतांनी फुलावर, चंद्रावर, चांदण्यावर लिहिण्यापेक्षा माकडीच्या माळावर, चिखलातील कमळावर व चंदनावर लिहावे असे अण्णांनी सांगितले. लिपस्टिक लावलेल्या ओठांवर नव्हे, तर भाकरीच्या भूकेने व्याकूळ झालेल्या पोटांवर लिहिण्याचा मानदंड त्यांनी लेखकांसमोर ठेवला. ताऱ्यांवर नव्हे, तर अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासाठी तरसणाऱ्यांच्या दुःखाच्या प्रेरणेने लिहिण्याची नवी मळवाट त्यानी प्रतिभावंताना दाखविली.

## जग बदलण्याची दृष्टी देणारा जीवनवाद :

अण्णांच साहित्य हे जीवनवादी साहित्य. कला ही कलेसाठी नव्हे, तर जीवनासाठीच असते, असे तत्त्वज्ञान त्यांनी साहित्यातून मांडले. जीवन आणि कलेचं नातं अतूट आहे. जीवनातील शोषण, संघर्ष, शील, समर्पण सोडून त्यांना लिहिणे मान्य नव्हते. वेलींवर नको, तर वेदनेवर लिहावे. रंग नको अंतरंगावर लिहावे. केवळ कातड्यावर नको, तर आतड्यावर लिहावे कसे, हेच आपल्या त्यांनी लेखनातून सूचित केले. भोगात बुडालेल्या माणसांपेक्षा त्यागाच्या एव्हरेस्टवर लिहिण्याची दृष्टी त्यांनी दिली. माणसांच्या मनाला सम्यक वळण लावणारा जीवनवाद समूर्त केला. विषमतेवर आधारित असलेली व्यवस्था बदलावी, शोषण थांबावे. शोषणाविरूद्धची लढाई एकजूटीने लढावी; ह्यासाठी जग बदलण्याची त्यांनी दृष्टी दिली.

जग बदल घालुनी घाव। सांगून गेले मला भीमराव
गुलामगिरीच्या या चिखलात। रूतून बसला का ऐरावत
अंग झाडुनी निघ बाहेरी। घे बिनीवरती धाव।।[४]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जग बदलण्यासाठी घाव घालावयास सांगितला आहे. गुलामगिरीतून, धनवंत आणि धर्मांधाच्या शोषणातून मुक्त होण्यासाठी सर्व शोषितांनी एक होण्याची गरज प्रतिपादन केली आहे. आर्थिक आणि सामाजिक समतेसाठी परिवर्तन आवश्यकच आहे; परिवर्तनाची ही लढाई एकजूट होऊनच लढाली, तरच यश प्राप्त होईल व दीन-दलितांचे दुबळे जीवन बदलेल ! दौलत फक्त धनिकांची नाही, तर संपूर्ण दुनियेची आहे. ऐतखाऊंनी शोषण करून संपत्ती जमा केली. जमीन मालकाची नव्हे, तर जो कसेल त्याची, हा कष्टकऱ्यांच्या जीवनात क्रांतिच्या मशाली पेटविणारा जीवनवाद अण्णांनी अभिव्यक्त केला.

यारे हातात गोफन घेऊ
रान राखाया एकीन जाऊ
ऐतखाऊंना हाकलून देऊ
जिवापरीस आमुची प्यारी
धरणी-कसेल त्याची सारी[५]

घाम गाळणाऱ्यांची जमीन व्हावी, दामवाल्यांची नव्हे. कामगार, मजुर, शेतकरी यांच्या घामाला मूल्य प्राप्त करून देणारा जीवनवाद अण्णांनी साहित्यातून आविष्कृत केला. दौलतीच्या राजाला, सर्जाला आणि शेजाऱ्याला सावकारशाहीचा विखारी कुंदा आरपार खुरपून, त्याचा रेंदा पाडण्यासाठी हाक दिली. भांडवलशाहीचा चिवट केणा फारच वाढल्यामुळे तो शेती पिकू देत नाही, समतेचा मळा फुलत नाही, साम्राज्यशाहीची काळी माकडं हातातला घास खाऊ देत नाहीत. दिवसा-ढवळ्या होणारी लूट थांबविण्यासाठी राबणाऱ्यांना एकीचा किल्ला बांधण्याचे आवाहन अण्णा करतात.

रातदिस राबून सालना साल
किती पिढ्या आम्ही काढायचं हाल
रोवू आता बांधावर बावटा लाल
काळावर चाल कर-हत्यार नीट धर

एकीचा बांधूनी किला रे शिवारी चला।।[६]

सावकार, भांडवलदार व साम्राज्यशाही शोषणाला संपविणारा लालबावट्याचा परिवर्तनवादी जीवनवाद अण्णांनी आपल्या रचनेतून साकार केला. वर्ग आणि वर्णव्यवस्थेला सुरूंग लावणारा जीवनवाद त्यांनी पीडितांना दिला.

### माती आणि माणसांची जाणीव ठेवणारा जीवनवाद :

महाराष्ट्रातील मातीचा आणि या मातीतील माणसांच्या कार्य-कर्तृत्वाची जाणीव ठेवणारा जीवनवाद ही अण्णांच्या प्रतिक्षेची मोठी देणगी आहे. महाराष्ट्र ही आपली मायभूमी असून मराठी भाषिकांची, संतमहंताची, ज्ञानवंतांची व नररत्नाचे दिव्य भांडार असलेली ही भूमी आहे, माती आहे; याच मातीने महाराष्ट्राला शूर, स्वाभिमानी व दिलदार मराठा माणूस दिला, याचा अचूक नि औचित्यपूर्ण वेध अण्णा घेतात.

महाराष्ट्र मायभू अमुची। मराठी भाषिकांची। संत महंताची।
ज्ञानवंतांना जन्म देणार। नररत्नांचे दिव्य भांडार। समरधिर घेत
जिथे अवतार ।।जी।।
शौर्याची अजरामर महती। आजही नांदती। सहयचलावरती।
मावळा दख्खनचा राहाणार। स्वाभिमानार्थ जिणे जगणार।
मराठा मानी आणि दिलदार।।जी।।[७]

महाराष्ट्राच्या भूगोलाचे, इतिहासाचे, ज्ञानेश्वरांचे, शूर शिवबांचे व त्यांच्या मावळ्यांचे, किल्ल्यांचे, कोकणच्या समुद्रकाठाचे, राणी लक्ष्मीबाई, उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके, महात्मा फुले, लोकमान्य टिळक इत्यादींच्या शौर्याचा सविनय शोध अण्णांनी घेतला. आपल्याच मातीचा आणि माणसांच्या गुणांची आणि त्यांच्या कर्तृत्वाच्या हिमालयाची जाणीव ठेवून, त्यांना चिरंजीव करणारा जीवनवाद अण्णांनी सरूप केला. मातीसाठी जगणाऱ्या, झुंजणाऱ्या व मृत्यूला कवटाळणाऱ्या क्रांतिसिंहांना अभिवादन करणाऱ्या जीवनवादाचे तोरण मराठी साहित्याच्या चिरेबंदी राजवाड्याच्या दाराला बांधले.

### सर्वधर्मसमभावाची शिकवण देणारा जीवनवाद :

साहित्याने समाजाला सूचकतेने शिकवायचे असते. कलात्मकतेने कुरूपतेला मारायचे असते. अमंगलाचा निषेध व मंगलाला ध्वनित करावयाचे असते. गुदगुल्या करण्याऐवजी वादळ-वारा झाडा-झुडपांना हालवितो, तशाप्रमाणे माणसांना हालवून जागृत करावयाचे असते. खवळलेला समुद्र नको असलेल्या गोष्टींना काठावर फेकतो, तसा लेखकाने अमानुषतेला नम्रतेने नाकारायचे असते. ज्ञानाचा, विवेकाचा, माणूसकीचा, सर्वधर्मसमभावाचा दीप माणसांच्या मनात पेटवायचा असतो. सूचकतेने शिकविणारे कोणतेही साहित्य श्रेष्ठ दर्जाचेच असते. अण्णांचे साहित्य सर्वधर्मसमभावाची सूचकतेने शिकवण देणारे साहित्य आहे. माणुसकीच्या धर्माला जागणारा, प्रत्येकाला अकलेची गोष्ट सांगणारा, बिलंदर बुडव्यांची प्रचिती देणारा, खुळंवाडीतील खुळ्यांचा, कृष्णाकाठच्या माणसांचा, सत्तूचा, फकिरा, विष्णूपंत कुलकर्ण्याचा, शंकर पाटलाचा, सावळा, राणोजींचा, माकडीच्या माळावरील माणसांचा, डोळे मोडीत चालणाऱ्या राधेचा, वैजयंताचा, आवडीचा, गीताचा, मास्तरचा सुंदर परिचय अण्णांनी आपल्या साहित्यातून करून दिला. विविध जाती-धर्माची कर्तृत्वसंपन्न माणसं त्यांनी साहित्यातून अजरामर केली. प्रतिभा जात, धर्म, लिंग यांच्या बंधनात अडकून अपंग होत नाही, ती सुष्टांचा स्वीकार व दुष्टांचा धिक्कार करते. सुष्टांना साष्टांग नमस्कार घालणारा व दुष्ट-दुर्जनांना धडा शिकविणारा जीवनवाद अण्णांनी आपल्या साहित्यातून मांडला. फकिरा मांग, विष्णुपंत कुलकर्णी,

शंकर पाटील व सत्तू भोसले, बिलवरी, अमीन, इनामदार अशा अठरापगड जाती, जमातीतील माणसांचे मनोरम चित्र रेखाटणारा व सर्वधर्मसमभावाची अचूक शिकवण देणारा जीवनवाद अण्णांनी दिग्दर्शित केला आहे. अज्ञान दूर करणारा, अंधळया-पांगळयांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणारा जीवनवाद त्यांनी आविष्कृत केला.

### विज्ञानवाद सांगणारा जीवनवाद :

अण्णा निरक्षर होते. लिहिता-वाचता येण्यापुरतं ज्ञान त्यांनी कष्टाने प्राप्त केलं. शिकलेल्या अंधश्रद्ध लोकांच्या डोळयात विज्ञानाचे अंजन घातले. देव दगडात नसतो, तर शिल्पकार, शेतकरी, शूरांच्या कर्तृत्वात असतो, याची दृष्टी देणाऱ्या जीवनवादाची तुतारी अण्णांनी फुंकली.

प्रथम मायभूच्या चरणा
छत्रपती शिवबाच्या चरणा
स्मरोनि गातो। कवना।।धृ।।
स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क करूनिया गर्जना
लोक उठविला जागा केला त्या लोकमान्यांना
कठिन काळी राष्ट्रनौकांना
मार्ग दाखविला तयांना
देशा दिली ज्यांनी प्रेरणा।।१।।[६]

गणेशाला नाकारून अण्णांनी शूरांच्या कर्तृत्वाला स्थान दिले. गणेशाला आशीर्वाद मागण्यापेक्षा जनतेसाठी, स्वातंत्र्यासाठी देह झिजविणाऱ्या झुंजार व्यक्तिमत्त्वाला अभिवादन केले; देशासाठी प्राणार्पण करणाऱ्यांना त्यांनी मनोभावे प्रणाम केला. ज्ञान नाकारणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेला अण्णांनी आव्हान दिले. स्वतःच्या स्वार्थासाठी दगडाला देव करणाऱ्या व माणसांचा जात-धर्माच्या नावाखाली छळ करणाऱ्या अपप्रवृत्तीविरूद्ध बंड केले, त्यांनी मातृभूमीला, राष्ट्रपुरुषांना नमन केले. 'फकिरा' ही कादंबरी देवाला नाही, तर सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या ज्ञानसूर्याला; म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. जनतेची कदर करणाऱ्या ह्या साहित्यिकाने म्हटले आहे की, ''माझा असा दावा आहे, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. त्या दलितांचं जीवन, तितक्याच प्रामाणिक हेतूने, निष्ठेने मी चित्रित करणार आहे, नि करीत आहे.''[७] शेषनागाची प्रतिमा उभी करून माणसाचं कर्तृत्व दडवणाऱ्या संस्कृतीविरुद्ध विद्रोह करणाऱ्या जीवनवादाचा जागर ह्यातून आपणास प्रत्ययाला येतो. वेदनेच्या पोटातून विद्रोहाचा जन्म होतो. माणसच माणसांचा छळ करीत आहेत, याचे दुःख अण्णांना झाले. विज्ञान सोंगाला नाही, तर सत्याला महत्त्व देते. अज्ञान साधार दूर करते; म्हणून त्याला आपण विज्ञान म्हणतो. अण्णांना विज्ञानाचा अर्थ कळला होता; म्हणूनच त्यांनी शेतात राबणाऱ्यांच्या, मजुरांच्या, शिल्पकारांच्या, त्यागही महात्म्यांच्या त्यागातच देव असतो, हे आवर्जून लिहिले व गर्जून सांगितलेही. हिरव्या, हिरव्या पात्यांवर पेन झिजविण्यापेक्षा ज्यांचे जगणेच मुळात व्यवस्थेने हिसकावून घेतले, तरीही हिमतीने जे जगतात त्यांची अक्षर लीळा-चरित्रे अण्णांनी लिहिली. अण्णा म्हणजे समाजाचे अज्ञान, अंधश्रद्धा दूर करणारा विज्ञानवादी लेखक!

## जगण्या-मरण्याचा अर्थ सांगणारा जीवनवाद :

जगणे म्हणजे काय? कशासाठी व कोणासाठी जगायचे? मरायचे ते कोणासाठी? ह्या प्रश्नांची उत्तरे अण्णांनी आपल्या समग्र साहित्यातून दिली आहेत. स्वतःसाठी जगणे, हे जगणे नव्हेच ! माणसं स्वतःसाठी जगत असतातच; परंतु इतरांसाठी जगणारी माणसं ही खरी-खुरी माणसं होत. अंधाराला जाळावं म्हणून स्वतःच आयुष्यभर दिवा होऊन जळणारी, चंदनाप्रमाणे झिजून दुसऱ्याचं आयुष्य सुगंधित करणारी, अंधळ्या-पांगळ्याची काठी होणारी, मृत मनाला संजीवनी देणारी, कुरकुरत जगण्यापेक्षा कष्ट करून प्रामाणिकपणे जगणारी, वाटून खाणारी, वाटून देत नसेल, न्याय नाकारीत असेल, तर त्याची कायमची वाट लावणारी, जगा आणि जगू द्या हे तत्त्व कठोरपणे पाळणारी, स्त्रीचे शील, पुरुषांचा स्वाभिमान आणि देशाच्या स्वातंत्र्याला जीवापाड जपणारी दुर्दम्य माणसं अण्णांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून अमर केली. कसं आणि कशासाठी जगावं, तर मातीसाठी, मातेसाठी आणि दुर्बलांना आधार आणि धार देण्यासाठी जगावं आणि मरावं, हा जगण्या-मरण्याचा अर्थ, जीवनवाद अण्णांनी साहित्यातून सजीवपणे साक्षात केला. सत्तूमुळेच वाचलेली सई म्हणते,

नसेल जरी माहेर, भाऊ असावा पाठीचा
गरिबांचा वाली जसा सत्त्याबा कुमजचा ।।[८]

सत्तू मथाजी चौघुल्यास मारतो, फकिरा स्त्रीचे शील लुटत नाही, तर खजिना लुटतो, रघुची पत्नी फकिराला म्हणते, ‘‘बाबा हा वाडा धुऊन घेऊन जा. परंतु... ह्या दोन मुलींची लग्न झालेली नाहीत. मी पदर पसरुन भीक मागते. आमची अब्रू...’’ यावर फकिरा म्हणतो, ‘‘आई, थांब! मी खजिना न्हेनार हाय. तुम्हास्नी ओरबाडाय मी आलो न्हाय. कारन, आब्रू खाऊन उपाशी मानसं जगत नसत्यात. जावा आपल्या घरात बसा!’’[९]

दलित महिलेचे प्राण वाचविणारा सत्तू, स्त्रीच्या शीलाचा सन्मान करणारा विचारी शीलवंत फकिरा, अशी कितीतरी सुदृष्टीची समर्पित माणसं अण्णांनी कथा, कादंबरी व अन्य प्रकारातून प्रकाशात आणली. स्वार्थाचा होम करून सेवेचा यज्ञ पेटविणारी, सत्यावर प्रेम करणारी, विषमतेला जाळणारी, नेतृत्व, दातृत्व आणि आभाळा एवढ्या कर्तृत्वाची त्यागी आणि घेण्यापेक्षा देण्यावरच अधिकाधिक प्रेम करणारी माणसं व अशाच प्रकारे वागण्याची व्यापक दृष्टी देणारा जीवनवाद अण्णांनी दिला. माणसातील भेदाला भंगविणारा, माणसं मानवतेच्या धाग्यांनी गुंफणारा, सामाजिक समतेच्या तत्त्वावर आधारित नवी समाजव्यवस्था निर्माण करण्याची दिशा देणारा, न्यायासाठी लढायला सांगणारा ज्ञान-विज्ञान आणि विवेकाची महती सांगणारा व प्रज्ञा, शील आणि करुणेचा विचार पेरणारा जीवनवाद अण्णांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केला. मेल्यानंतर उरणारा, व्यंगाना पूर्णतः कायमचे पुरणारा आणि संकटकाळी संयमाने जगण्याची प्रेरणा देणारा जीवनवाद अण्णांनी साहित्यातून आविष्कृत केला.

कला कशा प्रकारे लिहिली, यापेक्षा कला हृदयाला हलविणारी असावी. प्रेम, जिव्हाळा, न्याय, नीतीला मनात ठसविणारी कला असावी. लिहिल्याशिवाय मला झोपच येत नाही, या वृत्तीने अण्णांनी लेखन केले. शब्दाला आकार देत ते बसले नाहीत. काय लिहावं याचं पूर्ण भान त्यांना होत. सभोवतालच्या शोषणाने त्यांच्या जीवाची काहिली होत होती. प्रतिष्ठेसाठी, पैशासाठी, पुरस्कारासाठी लिहिण्याऐवजी त्यांनी सामान्यातल्या असामान्यत्वावर लिहून त्यांना प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. समाजातील वैर संपावं, द्वेष, मत्सराला काडी लावावी, नात्याचं पावित्र्य जपावं, कोणीही कोणाचं शोषण करू नये. जीवन सुंदर आहे. आपली दृष्टी सुंदर हवी, त्यामुळे जीवन शोकात्म नव्हे सुंदरच होईल. सुख जवळच असते; पण दुसरीकडे आपण ते शोधतो. सुखामागे धावल्याने सुख मिळत नाही; उलट दुःखच पदरी पडते. आशेच्या घोड्याला सद्‌बुद्धीचा लगाम लावला, तर तो स्वैर होणार नाही, निराशा येणार नाही. मृगजळाच्या मागे धावणे सोडले, तर मृत्यू येणार नाही. जीवनाला कंटाळू नका, ते खूपच सुंदर आहे; त्याचा विवेकाने आनंद घेत राहाण्याचा जीवनवाद ही अण्णांची मौलिक देणगी आहे !

मरण हे माणसाच्या पाचवीलाच पूजलं आहे; पण माणसान चांगल्या कामासाठी मरावं. 'फकिरा' ह्या कादंबरीतील राणोजी म्हणतात, "गावासाठी गेला म्हणतील. मरण कधीतरी येणारच. ते जर जोगणी आणीत असता आलं, तर गावावर उपकार होतील. आपल्या अंगावरच्या जखमा काळजावरच्या मोहर ठरतील. गबऱ्याच्या टापा कोरल्या जातील."[१०] दुसऱ्यासाठी मरण्याचे तत्त्वज्ञान अण्णांनी अभिव्यक्त केले आहे. जीवन दुसऱ्यासाठी जगायचं असतं, हा जीवनवाद ते जगाला सांगतात. मराठी समीक्षकांनी अण्णांच्या साहित्याला प्रचारकी ठरविले, दुय्यम दर्जाचे ठरविले. आकृतीवादी मराठी समीक्षा अण्णांच्या साहित्याला न्याय देणार नाही. टॉलस्टॉय म्हणतात, "श्रेष्ठ कलाकृती नेहमीच जीवनमूल्याचा प्रचार करीत असते." जीवन सुंदर करणाऱ्या मूल्यांची माणसांच्या मनोभूमीमध्ये कुशलतेने आपल्या लेखनकृतीतून पेरणी करणारा जीवनवाद अण्णांनी आपल्या साहित्यातून गोचर केला.

आज भारतात सामाजिक विषमता वेगळ्या रंग-रुपात पुढे येत आहे. दलित माणसांना जातीमुळे संधी देवून संपविले जात आहे. ब्राह्मण समाजाला लाजवेल असा जातियवाद बहुजन समाजात जोपासला जात आहे. शिवी ब्राह्मणांना देवून स्वतःच्या जातीचे गड-कोट मजबूत केले जात आहेत. दलित माणसांनाही सत्तेच्या धुंदीमुळे कळेनासे झाले आहे. बहुजनच बहुजनाचे शोषण करत आहे. आरक्षणाच्या सवलती घेणारे दलितही आपापसात भेदाभेद करीत आहेत. राजकारणी खत-पाणी घालून ही दरी वाढवित आहेत.

"अण्णाभाऊ मार्क्सवादी होते व त्यांचे इतिहासाचे सामाजिक आकलन मार्क्सवादी होते. याचबरोबर त्यांनी भारतीय समाजातील जातीचा प्रश्न लक्षात घेतला होता. भारतीय क्रांतीत जात्यंताचा प्रश्न महत्त्वाचा आहे. जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था व वर्गव्यवस्था याविरूद्धचे लढे समग्र दृष्टिकोनातून लढवले पाहिजेत. ते वेगवेगळे लढवले तर परिणामकारक होत नाहीत; याची त्यांना जाण होती. आज भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या विरुद्धचे संघर्ष जगभर तीव्र असताना अण्णाभाऊंच्या साहित्याचे वाचन आपल्या समाजाची व समाजातील अंतर्विरोधाची नीट ओळख करून देण्यासाठी आवश्यक आहे."[११] जातीअंताच्या लढाईतील नायकांनी वर्गवाद व वर्णवादाविरुद्धची लढाई एकजुटीने लढावी लागणार आहे. पुरोगाम्यातील ढोंगावर प्रहार करणे काळाची गरज आहे. शोषणाची नव-नवी केंद्रे प्रस्थापित करणाऱ्या बलवंत व्यवस्थेविरूद्ध एकजीव होऊन एलगार करणे आज सर्वच

'नाही रे' साठी अनिवार्य झाले आहे.

आता वळू नका। रणि पळू नका। कुणी चळू नका।

बिनी मारायची अजून राहिली। माझ्या जिवाची होतीया काहिली।।[१२]

### आजचे चित्र :

'अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील जीवनवाद' आणि दलितांमधील मातंग समाजाचे वास्तव चित्र नेमके कशाप्रकारचे आहे, याचा सविनय शोध खालीलप्रमाणे घेतला आहे. माझ्या आकलनास मर्यादा असू शकतील; परंतु जे मी गेल्या वीस ते बावीस वर्षांपासून अनुभवले, पाहिले, त्याची ही नम्र नोंद! जानेवारी दोन हजार सोळाच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर येथे महाराष्ट्रातील मातंग समाजातील तरुण कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित केले होते. आयोजक होते, सुप्रसिद्ध वक्ते, विधायक व ऋजू स्वभावाचे राजकारणी, द्रष्टे शिक्षणसम्राट, व्यासंगी-विचारवंत, प्रेमळ मंत्री, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय विषमतेविरुद्ध धैर्याने लढणारे प्रबुद्ध नायक प्रा. व माजी मंत्री आदरणीय लक्ष्मण ढोबळे सर.

समाजाला सुसंस्कृत, संयमी, समदृष्टीच्या संघर्षशील नेतृत्वाची गरज असते. नेतृत्व हे प्रगल्भ, निर्लेप, निरामय, निष्ठावंत, निष्कपट, अभ्यासू नि निर्भीड असायला हवे. मातंग समाज सक्षम व सर्मपित नेतृत्वाच्या शोधात आहे. आज प्रत्येक अभावग्रस्तांना असे वाटते आहे की, नेतृत्व, हे फक्त राजकीय असते. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक अशा अनेक पातळयांवर नेतृत्व असते, याचा विसरच समाजाला पडला आहे. राजकारण समाजाच्या कल्याणाचा एक मार्ग आहे. वर्तमानातले राजकीय वास्तव (समाजातले पुढारीच श्रीमंत झाले आहेत) अस्वस्थ करणारे आहे. प्रस्थापित राजकीय पक्षातही वर्णव्यवस्था चातुर्याने राबविली जाते. आपलंच ऐकणारा दलित माणूस प्रस्थापितांना लायक

वाटतो. प्रभावी दलित व्यक्तीला बदनाम करून बाजूला फेकले जाते. मातंग समाजाला प्रस्थापित पक्षांनी न्याय दिला; पण अस्मिता जपणाऱ्या नेत्यांचे प्रस्थापित पक्षांनी अस्तित्व धोक्यात आणले. (आपली माणसं आपली माती) प्रा.लक्ष्मण ढोबळेसरांचे मातंग समाजात सर्वदूर नाव आहे. ह्या बिनीच्या लढवय्या नेतृत्वाने समाजाला न्याय मिळवून घेण्याच्या महत्त्वकांक्षेनेच लढणारे सैनिक (कार्यकर्ते) प्रशिक्षित असावेत; म्हणूनच निवासी शिबिरे घेतली. व्यासंगी वक्ते आमंत्रित करून कार्यकर्त्यांना लढण्याची शिदोरी दिली. वक्त्यांचा यथाशक्ती सन्मान केला. शिबिरात वक्त्यांचे व्याख्यान संपल्यानंतर कार्यकर्ते आणि वक्ते यांच्यात प्रश्नोत्तरे झाली. गावपातळीवर काम करणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांनी प्रश्न विचारले. मला स्वत:ला या शिबिरातून लढायला, लिहायला बळ मिळाले. अशा प्रकारची प्रबोधन शिबिरं घेणारे मातंग समाजात किती नेते आहेत? संघटना, चळवळी व नेते उदंड आहेत; पण समाजोद्धाराच्या दृष्टी बाबत समाजात दुष्काळच आहे.

मातंग समाजाला समजून न घेता शिव्या देणारा, राजकीय स्वार्थासाठी आपापसात लढून रक्तबंबाळ होणारा, बाहेरचं ऐकून फक्त फुटकळ प्रतिक्रिया देणारा, समाजाच्या सेवेची नाटकं करून राजकीय सत्तेत जाणारा, प्रशासकीय अधिकारी, लेखन, शिक्षण, उद्योगधंदे ह्या क्षेत्राकडे लक्ष नसणारा (काही आहेत; पण स्वांतसुखाय आहेत), पोट भरणे म्हणजेच समाजसेवा असे समजणारा, राखीव जागेच्या फायद्यामुळे सुखी व श्रीमंतीत लोळणारा कर्मचारी, नोकरी नसलेले बेकार तरुण; अशा विविध वर्गात मातंग समाज विभागला आहे. कुणाचाच कुणाबरोबर संवाद नाही. विसंवाद बऱ्यापैकी सुरूच आहे. अशा पार्श्वभूमीवर प्रा.ढोबळेसरांनी बंडखोर कार्यकर्ते तयार करण्यासाठी जो प्रयत्न सुरू केला आहे, तो मातंग समाजाच्या उज्वल उद्यासाठी मौलिक आहे. मन, मनगट आणि मेंदू मजबूत असलेली कार्यकर्त्यांची फळी तयार करण्यासाठी बुद्ध, फुले, शाहू, बाबासाहेब अण्णाभाऊ यांच्या विचारांचे टॉनिक देणे अनिवार्य होते. प्रा.ढोबळेसरांनी, हे काम नेकपणाने सुरू केले आहे. मनभेद होऊ न देता सरांना ह्या कार्यासाठी सहकार्य करणे आवश्यकच आहे. ज्या समाजाला प्रशिक्षित कार्यकर्त्यांची फौज आहे, तो समाज कोणत्याही काळात मागे राहणार नाही. राजकीय सत्तेसाठी दबावगट असावाच; परंतु राजकारणाच्या गाडीपेक्षा कलेक्टर होण्यासाठी समाजातल्या मुलांना प्रेरणा देणं नितांत गरजेचं झालं आहे. मुलींच्या शिक्षणाचं प्रमाण वाढवणं, त्यांना सर्वच क्षेत्रातील स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहन देणं, मार्गदर्शन केंद्राची निर्मिती करणे, तरुण-तरुणींवर संस्कार करणे साहित्यिकांसाठी कार्यशाळा घेणे, उद्योगधंद्याला लायक तरुण-तरुणी तयार करणे, स्वाभिमानासारखी अनमोल संपत्ती जपणे आणि शक्तिशाली संघटन गाव पातळीपर्यंत बांधणे, हे अवघड काम धोरण, दृष्टी आणि धैर्य असणारा माणूसच करू शकतो; या व अन्य बाबींचा संयमाने विचार केला, तर प्रा.लक्ष्मण ढोबळेसर यासाठी समर्थ आहेत. वर्ग आणि वर्णवादाविरुद्धच्या जागली आपल्याला निष्ठेने घालावयाच्या आहेत. अण्णांचा जीवनवाद, सामाजिक व आर्थिक समता आणि न्यायासाठी जागली घालणारा आहे. झोपलेल्या समाजाला, थंड झालेल्या तरुणांना सवलतीचे तुकडे चघळत सुस्त झालेल्यांना, अज्ञानी हकीमांना आणि समाजाचा सौदा करणाऱ्या पुढाऱ्यांना वैचारिक जागलीच्या चळवळीत सविनय सामावून घेवूयात.

**संदर्भ :**


१) पोतदार डॉ.माधव रा., शाहीर अमरअण्णा, अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००४., पृ.१४

२) तत्रैव, पृ.३२, ३३

३) साठे अण्णा भाऊ, वैजयंता, मॅजेस्टीक प्रकाशन, गिरगाव, मुंबई, पृ.

४) साठे अण्णाभाऊ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, संपा.अर्जुन डांगळे, नीला उपाध्ये, पृ.६३

५) तत्रैव, पृ.६०

६) तत्रैव, पृ.१५

७) साठे अण्णा भाऊ, वैजयंता, मॅजेस्टीक प्रकाशन, गिरगाव, मुंबई, पृ.

८) साठे अण्णाभाऊ, फकिरा, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, संपा.अर्जुन डांगळे, नीला उपाध्ये, पृ.९४२

९) तत्रैव, पृ.९९१

१०) तत्रैव, पृ.८८०

११) कॉ.पानसरे गोविंद, बरबाद्या कंजारी, निवेदन

१२) साठे अण्णाभाऊ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय, संपा.अर्जुन डांगळे, नीला उपाध्ये, पृ.६२